नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक ०४/०४/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत उमरी शिवार कामठी येथे दिनांक ०२/०४/२०२२ चे २२.०० वा. ते २३.४५ वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.–२०/डी.ई–७६१७ क्रमांकाच्या ट्रकला थांबविले असता आरोपी चालकाने अंधाराचा फायदा घेवुन काही अंतरावर गाडी थांबवून पळुन गेला. सदर एम. एच.–२०/डी.ई–७६१७ क्रमांकाच्या ट्रकची पाहणी केली असता त्यामध्ये एकुण ३३ (बैल, गोरे) जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. त्यापैकी ७ जनावरे मृत अवस्थेत मिळून आले. २६ जनावरे कि. ३,०५,०००/–रू. ची व वाहन कि. १४,००,०००/–रू. असा एकुण किंमती १७,०५,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक मनिराम भुरे, पो.स्टे. मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ११(१),(ड)प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम ५(अ), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मनोहर जंगवाड मो.क्र. ८३२९९४८१०१ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. वियजकुमार मगर, अप्पर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी कन्हान विभाग श्री. मुख्तार बागवान यांचे मार्गदर्शनात ठाणेदार मौदा पोनि श्री हेमंतकुमार खराबे, पोलिस हवालदार मनोहर जंगवाड, पोलीस मनिराम भुरे, पोलीस शिपाई नितीन पारवे यांनी केलेली आहे.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर